Principal
सरळसेवा -

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल.vishi१-hted@mah.gov.in दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:- न्यायाप्र २०२३/प्र.क्र.१८/विशि-१ दिनांक:- १४ मार्च, २०२४

प्रति,

१) संचालक,
उच्च शिक्षण, पुणे.
२) कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.
३) सर्व विभागीय सह संचालक,
उच्च शिक्षण.
४) सहायक आयुक्त (मा.व. क.),
सर्व विभागीय आयुक्त कार्यालये.

विषय:- मराठवाडा लिगल ॲण्ड जनरल एज्युकेशन सोसायटी यांनी दाखल केलेली याचिका.
(मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र.३१०८/२०२३ व मा. सर्वोच्च न्यायालय विशेष अनुमती याचिका क्रमांक ४१७२/२०२४)

केंद्र शासनाने The Central Educational Institutions (Reservation in Teachers Cadre) Act,२०१९ अन्वये केंद्रीय विद्यापीठे व केंद्रीय शिक्षण संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीमध्ये संवर्गनिहाय आरक्षणाचे धोरण लागू केले आहे. त्याच धर्तीवर राज्यातील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामधील अध्यापकांकरिता संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्यासाठी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ करण्यात आला आहे.

०२. मराठवाडा लिगल अँड जनरल एज्युकेशन, छत्रपती संभाजी नगर या संस्थेकडून माणिकचंद पहाडे विधि विद्यालय आणि इंदिराबाई भास्करराव पाठक महिला, कला, वाणिज्य आणि शास्त्र महाविद्यालय अशी दोन महाविद्यालये चालविण्यात येतात. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ आणि त्याअंतर्गत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले स्पष्टीकरण/ सुचना विचारात घेऊन संस्थेच्या दोन्ही महाविद्यालयांमधील प्राचार्यांची दोन पदे भरण्यासाठी बिंदू नामावली तपासून घेण्याबद्दल उपकुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर

मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडून कळविण्यात आले होते. तथापि प्राचार्य हे पद एकाकी पद असून सदर पदाला आरक्षण लागू होत नाही, असा संस्थेचा दावा आहे. त्याकरिता संस्थेने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र.३१०८/२०२३ दाखल केली होती.

०३. प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७ ऑगस्ट,२०२३ रोजी अंतिम आदेश पारित केले आहेत. सदर आदेशातील कार्यात्मक भाग पुढील प्रमाणे आहे:-

32. For the reasons stated above, we are inclined to allow the petition as follows:

A. The writ petition is partly allowed.

B. The impugned letter dated 11.03.2022 issued by the respondent No. 1, letter dated 04.05.2022 issued by the respondent No. 5, letter dated 14.09.2022 issued by the respondent No. 3 are quashed and set aside.

C. It is hereby declared that the posts of principals in the colleges run by the petitioner institution are not governed by the policy of reservation and the provisions of the Act of 2021.

D. The respondents are hereby directed to process the proposal of the petitioner for approving advertisement and granting permission to recruit the posts of principals by following due procedure of law as early as possible and in any case within a period of two (02) weeks from today.

E. The rule is made absolute in above terms. There shall be no order as to costs.

सदर याचिकेचा निर्णय शासनाच्या विरूध्द लागला होता.

०६. मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्र.३१०८/२०२३ मध्ये दिलेला निर्णय शासनाच्या धोरणाविरुध्द होता. यास्तव, त्याविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका क्रमांक ४१७२/२०२४ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेचा निर्णय दिनांक ४ मार्च,२०२४ रोजी लागला असून तो खालीलप्रमाणे आहे:-

1 Delay condoned.

2. We are not inclined to interfere with the order impugned herein under Article 136 of the Constitution of India.

3. The petition for Special Leave to Appeal is dismissed.

4. Pendnig applications are disposed off.

मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ आणि मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त आदेशांची प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी तसेच, अन्य समान स्वरुपाच्या प्रकरणांमध्ये काटेकोर अंमलबजावणी करावी.

(सं.रा.उतेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (१६-ब), मंत्रालय, मुंबई.

२) उप सचिव (विशि)(तांशि)(मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) निवड नस्ती, (विशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.